**वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर, जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर**

**लेखापरीक्षण अहवाल सन 2017-18**

**जा.क्र.स्था.18/ब/लेपअ/वक्फ बोर्ड/2017-18/** 793

**कार्यालय,**
**सहायक संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**छत्रपती संभाजीनगर**
**दिनांक :-** 11.04.2025

**प्रेषक,**

**सहायक संचालक,**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**छत्रपती संभाजीनगर**

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर**

वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर जिल्हा संभाजीनगरचे सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री.एस.एन.ठेंगणे,सहायक लेखापरीक्षा अधिकारी,श्री.झेड.सी.सय्यद,कनिष्ठ लेखापरीक्षक, श्री.जे.एफ.पटेल, कनिष्ठ लेखापरीक्षक, श्री.सुशील पडोळ, कनिष्ठ लेखापरीक्षक, व श्री. वाय.आर.बहुरे,कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 03/07/2024 ते 19/08/2024 या कालावधीमध्ये पूर्ण केले.

श्री.गो.आ.गंडे, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 03/06/2025 या रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर यांचेशी चर्चा करून लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमिकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी / अधिकारी वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत होते.

| पदनाम | पदाधिकारी / अधिकारी यांचे नाव | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | श्री.ए.आर.कुरेशी | 01/04/2017 | 12/07/2017 |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | श्री.एस.सी.तडवी | 13/07/2017 | 31/03/2018 |

सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
छत्रपती संभाजीनगर

**Chief Executive Officer**
**Maharashtra State Board of Waqfs,**
**Chhatrapati Sambhajinagar**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ
छत्रपती संभाजीनगर
आवक शाखा क्र. 8174
शाखा Audit
दिनांक 23 JUL 2025
उप.मु.का.अ.

Audit 23/07/2025

| 1 | अंदाजपत्रकीय तरतुद व कमी अधिक खर्चाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 9 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

मुत्तवल्लीने असे अंदाजपत्रक मंडळास सादर केल्याचे दिसून आले नाही. प्रत्येक वर्षी मंडळाने पुढील आर्थिक वर्षासाठी त्या आर्थिक वर्षातील अपेक्षीत जमा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावयास हवे आणि त्याची एक प्रत राज्य सरकारला पाठवावयास हवी अशी तरतूद असताना मंडळाने सदर अंदाजपत्रक राज्य शासनाला पाठविलेबाबत दिसून आले नाही. लेखापरीक्षणामध्ये सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक मंडळाने मंजुर केलेबाबत ठराव तसेच मंडळाने अंदाजपत्रक मंजूर केलेबाबत दिसून आले नाही. सन 2017-2018 लीटीगेशन फी (कोर्ट) व लीगल फी या सदराखाली रु.15 लक्ष तरतुद असताना लेखापरीक्षणास सादर केलेल्या खर्चाच्या अहवालात रु.890000/- एवढा दर्शविला आहे.

सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करत असतांना अंदाजपत्रकातील (वक्फ फंड+ इस्टीटयुशन फंड) एकूण रक्कम रु.213354944/- एवढी अंदाजे तरतुद करण्यात आलेली असून प्रत्यक्ष जमा रक्कम रु.40533514/- एवढी असून रक्कम रु.172821430/- ची तुट जमा बाजूस दिसून येत आहे. तसेच खर्चाची अंदाजपत्रकातील अंदाजे तरतुद रक्कम रु.90988931/- केलेली आहे. परंतु वित्तीय वर्षाचे प्रमाणकांचे लेखापरीक्षण करीत असताना एकूण खर्चाच्या (वक्फ फंड+ इस्टीटयुशन फंड) प्रमाणकांची बेरीज केली असता ती रु.37196267/- एवढी येते. अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष केलेल्या कमी/अधिक खर्चाबाबत वक्फ मंडळाने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेतलेली नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना उपलब्ध केलेल्या अंदाजपत्रकाची व जमा खर्च विवरणपत्राची पडताळणी केली असता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) वक्फ अधिनियम 1995 चे कलम 44 (1) नुसार प्रत्येक मुत्तवल्लीने, प्रत्येक वर्षी ज्याप्रकारे नमूद केलेले असेल त्याप्रमाणे आणि त्या पध्दतीनुसार पुढील आर्थिक वर्षात अंदाजपत्रक तयार करावयास हवे, त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कालावधीमध्ये अंदाजीत जमा आणि खर्च दाखवावयास हवे. तसेच कलम 44 (2) अन्वये अशा प्रकारचे अंदाजपत्रक हे प्रत्येक मुत्तवल्लीने आर्थिक वर्ष सुरु होण्याच्या आधी किमान 30 दिवसांपूर्वी मंडळास सादर करावयास हवे, असे असताना मुत्तवल्लीने असे अंदाजपत्रक मंडळास सादर केल्याचे दिसून आले नाही.

2) वक्फ अधिनियम 1995 चे कलम 78 (1) अन्वये ठरवून दिलेल्या आणि ठरवून दिलेल्या अशा

समयी प्रत्येक वर्षी मंडळाने पुढील आर्थिक वर्षासाठी त्या आर्थिक वर्षातील अपेक्षीत जमा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करावयास हवे आणि त्याची एक प्रत राज्य सरकारला पाठवावयास हवी अशी तरतूद असताना मंडळाने सदर अंदाजपत्रक राज्य शासनाला पाठविलेबाबत दिसून आले नाही.

3) वक्फ अधिनियम 1995 चे कलम 78 (3) अन्वये राज्य शासनाकडून सुचना मिळाल्यानंतर राज्य शासनाने सुचविलेले फेरफार, दुरुस्ती किंवा बदलाबददल मंडळ शासनास लेखी विनंती करु शकेल आणि राज्य शासन त्या निवेदनाचा विचार करून तो मिळाल्यापासून तीन आठवडयाचे आंत त्या प्रकरणासंदर्भात आपल अंतिम निर्णय मंडळास कळविल, आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम राहिल. तसेच कलम 78 (4) नुसार उप कलम अंतर्गत राज्यशासनाचा निर्णय मिळाल्यानंतर राज्य शासनाकडून अंतिमपणे सुचविण्यात आलेले फेरफार, दुरुस्ती, बदलांचा आपल्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करावयास पाहिजे आणि अशाप्रकारे फेरफार दुरस्त किंवा बदल करण्यात आलेले अंदाजपत्रक हे अंदाजपत्रक राहिल, ते मंडळादवारे मंजूर केले पाहिजे अशी तरतुद असताना लेखापरीक्षणामध्ये सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक मंडळाने मंजुर केलेबाबत ठराव तसेच मंडळाने अंदाजपत्रक मंजूर केलेबाबत दिसून आले नाही. तेव्हा मंडळाच्या संमतीशिवाय मंजूर केलेले अंदाजपत्रक नियमबाहय आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करत असतांना अंदाजपत्रकातील (वक्फ फंड+ इस्टीटयुशन फंड) एकूण रक्कम रु.213354944/- एवढी अंदाजे तरतुद करण्यात आलेली असून प्रत्यक्ष जमा रक्कम रु.40533514/- एवढी असून रक्कम रु.172821430/- ची तुट जमा बाजूस दिसून येत आहे. तसेच खर्चाची अंदाजपत्रकातील अंदाजे तरतुद रक्कम रु.90988931/- केलेली आहे. परंतु वित्तीय वर्षाचे प्रमाणकांचे लेखापरीक्षण करीत असताना एकूण खर्चाच्या (वक्फ फंड+ इस्टीटयुशन फंड) प्रमाणकांची बेरीज केली असता ती रु.37196267/- एवढी येते. खर्च रक्कमेत रक्कम रु.53792664/- ची तफावत दिसून येते. त्यामूळे सन 2017-18 या वित्तीय वर्षाचे जमा व खर्चाचे (वक्फ फंड+ इस्टीटयुशन फंड) अंदाजपत्रक वास्तवदर्शी तयार केले नसल्याचे आढळून आले.

5) अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2017-18 मध्ये डेली वेजेस या सदराखाली अंदाजत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.147050/- एवढा खर्च नोंदविला आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरा या सदराखाली अंदाजपत्रकात तरतुद केलेली नसतानाही त्यावर रु.104380/- एवढा खर्च नोंदविला आहे. तरी तरतुदीशिवाय केलेला खर्च लेखामान्य करता येत नाही. सदरबाबत मंजूरी घेवून दर्शवावे.

6) अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2017-18 मध्ये बोर्ड मिटींग एक्सपेंस करीता रक्कम रु.2.00 लक्ष तरतुद असताना प्रत्यक्ष खर्च रु.216267/- एवढा केला आहे. तेव्हा रु.16267/- इतका खर्च अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्तीचा नोंदविण्यात आलेला आहे. तरी तरतुदीशिवाय केलेला खर्च लेखामान्य करता येत नाही. सदरबाबत मंजूरी घेवून दर्शवावे.

7) अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2017-18 मध्ये (Institute Fund) स्टेशनरी खरेदी या सदराखाली तरतुद नसताना प्रत्यक्ष खर्च रु.24700/- एवढा केला आहे. तेव्हा रु.24700/- इतका खर्च अंदाजपत्रकीय तरतुद नसतांना नोंदविण्यात आलेला आहे. तरी तरतुदीशिवाय केलेला खर्च लेखामान्य

करता येत नाही. सदरबाबत मंजूरी घेवून दर्शवावे.

8) अंदाजपत्रकातील खर्च बाजुची तपासणी केली असता सन 2017-18 मध्ये लीटीगेशन फी (कोर्ट) व लीगल फी या सदराखाली रु.15 लक्ष तरतुद असताना लेखापरीक्षणास सादर केलेल्या खर्चाच्या अहवालात रु.890000/- एवढा दर्शविला आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा खर्च कमी झाल्याचे आढळून आले असून मध्ये लीटीगेशन फी (कोर्ट) व लीगल फी या सदराखाली रु.15 लक्ष एवढी तरतुद मोघम स्वरूपात केल्याचे दिसून येते.

9) अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष केलेल्या कमी/अधिक खर्चाबाबत वक्फ मंडळाने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेतलेली नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DMESNTM7601 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे परभणी येथील उरुस वर्ष 2017-18 साठी संयोजक नेमणे तसेच कार्यक्रमावर झालेलया खर्चाबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | वक्फ फंड छत्रपती संभाजीनगर | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 4 | 284000 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 284000 | 0 | 0 | 0 |

खर्चाचे मुळ प्रमाणके, पावत्या आणि कार्यक्रम राबविल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र, कार्यक्रमाचे फोटो, कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविलयाबाबतचे सक्षम अधिका-याचे उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेस संलग्न केलेले नाहीत. रक्कम प्राप्त झालेबाबत संयोजकांच्या पोहच पावत्या संचिकेस संलग्न केलेले नाहीत.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब रहे. परभणी येथील उरुस वर्ष 2017-2018 साठी विविध उपक्रम राबविणेसाठी संयोजक नेमणे बाबत निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब (संयोजक नेमणे) | तपशिल |
|---|---|---|
| 1 | उरुस कालावधी | दिनांक 31/01/2018 ते 15/02/2018 |
| 2 | जाहीर प्रसिध्दी | दैनिक औरंगाबाद टाईम्स दिनांक 20/01/2018 |
| 3 | प्राप्त अर्ज | एकूण 26 अर्ज प्राप्त |

सदर संयोजकासाठी एकूण 26 अर्ज प्राप्त झाले व सदर अर्जांची छाननी केल्यानंतर त्यामधुन जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांचे पत्र जा.क्र.वक्फ/परभणी/426/2018 दिनांक 25/01/2018 अन्वये एकूण खालीलप्रमाणे 12 संयोजक नेमण्यात आले असून त्यांना खालीलप्रमाणे कामवाटप व रक्कम अदा केली. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | कार्यक्रम | संयोजकाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | जलसा-ए-किरअत | मोहम्मद रईस अहमद नजमी | 10000 |
| 2 | बजमे ख्वातीन | श्रीमती नसीम सिददीकी | 10000 |
| 3 | रंग रौगन | अब्दुल समद खान | 9000 |
| 4 | मुशायरा | अजमत खान | 40000 |
| 5 | कव्वाली | महंमद इलियास | 40000 |
| 6 | शब-ऐ-गजल | शाहेदखान शमीम खान | 30000 |
| 7 | नश्र व इशाअत | काझी मोहम्मद फहीमोदीन, जिल्हा प्रतिनिधी रोजनामा एशिया एक्सप्रेस | 25000 |
| 8 | तहेरीर व तकरीर | महेमूद खान, आजतक पत्रकार | 15000 |
| 9 | संदल व गुसल | नसीर अहेमदखान नजीरखान | 15000 |
| 10 | फुटबॉल | उमर चाऊस नगरसेवक | 40000 |
| 11 | क्रिकेट | 1) अहसान खान अब्दुल रज्जाक खान<br>2) सय्यद शम्सुल इस्लाम हाश्मी | 40000 |
| 12 | सुफीयाना | अब्दुल समी सौदागर | 10000 |
| | | एकूण :- | 284000 |

वरीलप्रमाणे रुपये 284000/- खर्च परभणी येथील उरुसासाठी संयोजकांना रक्कम विविध कार्यक्रम राबविण्यात आले. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1) संयोजकांनी कार्यक्रम राबवून वरीलप्रमाणे खर्च केला आहे. त्याबाबत खर्चाचे मुळ प्रमाणके, पावत्या आणि कार्यक्रम राबविल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र, कार्यक्रमाचे फोटो, कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविलयाबाबतचे सक्षम अधिका-याचे उपयोगिता प्रमाणपत्र संचिकेस संलग्न केलेले नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे झालेल्या खर्चाची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

2) रक्कम प्राप्त झालेबाबत संयोजकांच्या पोहच पावत्या संचिकेस संलग्न केलेले नाहीत.

3) उर्स निमीत्त नुमाईश मधील दिनांक प्रत्येकी गाळा दिनांक 01/02/2018 ते 15/02/2018 पर्यंत रुपये 3500/- प्रमाणे वाटप केलेले असून सदरील रक्कम मंडळाकडे जमा केल्याचे अभिलेखे आढळून आले नाही.
4) सदर अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 03/07/2024 रोजी मंडळास निर्गमीत करण्यात आलेला असून सदरबाबत मंडळाने उत्तर लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 2 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DMESNTM7601 |

| 3 | सन 2017-2018 मधील दर्गा हजरत शहानुरमियाँ हमवी रहे. उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथील फुल बैठकीच्या लिलावाबाबत. |
|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| 0 | वक्फ फंड, छत्रपती संभाजीनगर. |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 3 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 28814 | 1500 | 0 | 0 |

निवीदा सुचनेतील अट क्रमांक 11 अन्वये निवीदा मंजुर झाल्यानंतर गुत्तेदाराकडून इसारा रक्कमेच्या 3 टक्के रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना गुत्तेदारांकडून असा करारनामा केलेला नाही. तरी इसारा रक्कम रुपये 50000 X 3 % = 1500/- वसूल करावी. निवीदा सुचनेतील अट क्रमांक 5 ब अन्वये नुसार अर्जदार हा गुत्तेदार/एजन्सी/भागीदार फर्म/सोसायटी /उदयोग व्यवसाय करत असेल तर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना सदर वरील तीनही पुरवठादार अधिकृत नसताना नियमबाहयरीत्या निवीदा प्राप्त करुन मंजुर केल्याचे दिसून येते. सदर निवीदा सुंचनेतील निवीदेची अंदाजीत रक्कम विभागाने रुपये 250000/- एवढी ठरवलेली असतांना वरीलप्रमाणे गुत्तेदाराचे दर कमी आल्याने त्यांचेसोबत वाटाघाटी करणे किंवा फेरनिवीदा बोलविणे आवश्यक असताना बोलीत भाग घेणा-याबरोबर कोणतेही वाटाघाटी न करता मोहम्मंद समी मोहम्मंद गणी यांना रुपये 221186/- मध्ये गुत्ता देण्यात आल्यामुळे रुपये 28814/- एवढया रकमेने गुत्ता कमी गेल्याने मंडळाचे रुपये 28814/- चे नुकसान झालेले आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत शहानुरमियाँ हमवी रहे. उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर येथील फुल बैठकीच्या सन 2017-2018 या वर्षासाठी निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब (फुल बैठक) | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | 50000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | 250000 |
| 3 | को-या निवीदांची किंमत | 2000 |
| 4 | फुल बैठक कालावधी | दिनांक 21/09/2017 ते 20/09/2018 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | दैनिक हिंदूस्तान व दैनिक एशिया एक्सप्रेस, औरंगाबाद (नस्तीसोबत दैनिक संलग्न नाही) |
| 6 | करारनामा | करारनामा केलेला नाही. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी | दिनांक 12/09/2017 ते 18/09/2017 |

| | | |
|---|---|---|
| 8 | निवीदा उघडणे | दिनांक 19/09/2017 वेळ दुपारी 01-00 वाजता |
| 9 | प्राप्त निवीदा | 1) मोहम्मद अली मोहम्मद गणी - रुपये 200000<br>2) मोहम्मंद समी मोहम्मंद गणी - रुपये 221186<br>3) मोहम्मंद समीर मोहम्मंद नईम - रुपये 175000 |
| 10 | निवीदा मंजुरी | मोहम्मंद समी मोहम्मंद गणी - रुपये 221186 यांची निवीदा सर्वात रुपये 221186 जास्त रकमेची असल्याने मंजूर करण्यात आली. |
| 11 | पुरवठा आदेश | जा.क्र.मरावमं/एसएनटी/2441/2017 दि. 29/09/2017 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा | पावती क्रमांक 3526 दिनांक 20/09/2017 रुपये 221186/- |

वरील प्रमाणे फुल बैठकीसाठी एकुण तीन निवीदा प्राप्त झाल्या असुन सर्वात कमी दराची निवीदा मोहम्मंद समी मोहम्मंद गणी यांची असल्याने संबंधीतास पुरवठा आदेश देण्यात आला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1) निवीदा सुचनेतील अट क्रमांक 11 अन्वये निवीदा मंजुर झाल्यानंतर गुत्तेदाराकडून इसारा रक्कमेच्या 3 टक्के रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना गुत्तेदारांकडून असा करारनामा केलेला नाही. तरी इसारा रक्कम रुपये 50000 X 3 % = 1500/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.
2) निवीदा सुचनेतील अट क्रमांक 5 ब अन्वये नुसार अर्जदार हा गुत्तेदार/एजन्सी/भागीदार फर्म/सोसायटी /उदयोग व्यवसाय करत असेल तर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत निवीदेसोबत जोडणे आवश्यक असताना सदर वरील तीनही पुरवठादार अधिकृत नसताना नियमबाहयरीत्या निवीदा प्राप्त करुन मंजुर केल्याचे दिसून येते. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
3) सदर निवीदा सुंचनेतील निवीदेची अंदाजीत रक्कम विभागाने रुपये 250000/- एवढी ठरवलेली असतांना वरीलप्रमाणे गुत्तेदाराचे दर कमी आल्याने त्यांचेसोबत वाटाघाटी करणे किंवा फेरनिवीदा बोलविणे आवश्यक असताना बोलीत भाग घेणा-याबरोबर कोणतेही वाटाघाटी न करता मोहम्मंद समी मोहम्मंद गणी यांना रुपये 221186/- मध्ये गुत्ता देण्यात आल्यामुळे रुपये 28814/- एवढया रकमेने गुत्ता कमी गेल्याने मंडळाचे रुपये 28814/- चे नुकसान झालेले आहे. पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATZCSM6701 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | दर्गा हजरत सय्यदशहा तुराबुल हक्क रहे. परभणी येथील परिसरात हॉटेल, टिन शेड, पान शॉप , दुकाने, गुळ फुटाणे, शेरणी दुकाने चालविण्याचा ठेका देणेबाबत. | | | | |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | वक्फ फंड | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 4 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 913900 | 0 | 0 |

पुरवठा आदेशाप्रमाणे तसेच निवीदेतील अट क्रमांक 13 अन्वये मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम निवीदा मंजुर करण्याच्या दिनांकापासून 03 दिवसाच्या आत मंडळाकडे भरली नाही. तर निवीदा रदद करण्यात येईल व गुत्तेदाराने भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल असे असताना सदर पुरवठादाराने रु.600000/- भरल्याबाबत पावती क्र.1110 दि. 26/07/2017 रु.600000 या पावतीवरुन दिसून येते. उर्वरीत रक्कम रु.905000/- भरल्याबाबत पावत्या दिसून आल्या नाहीत. कंत्राटदाराने इसारा रक्कम रुपये 300000/- भरलेली असून त्याप्रमाणे निविदेतील अट क्रमांक 11 नुसार ठेकेदारास निविदा मंजूर झाल्यानंतर इसारा रक्कमेच्या 3 टक्के रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असतांना रुपये 100 रुपायाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याचे लेखापरीक्षण पथकास आढळून आले आहे. तरी इसारा रक्कम रुपये 300000 X 3 % = 9000 वजा 100 एकूण रुपये 8900/- ठेकेदाराकडून वसूल करुन अनुपालन सादर करावे. कंत्राट संपल्यानंतर दि.19/07/2018 रोजी दर्गा परिसर रिकामा केल्यानंतर तेथे सर्व साफसफाई केलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र दिसून आले नाही. सदर निवीदेची किंमत अंदाजे 20 लक्ष ठरविण्यात आली होती, मंडळाचे हित पाहता बोलीची रक्कम 20 लाखापर्यंत बोलून संबंधीताशी वाटाघाटी करुन किंवा फेरनिवीदा बोलवून 20 लाखापर्यंत ठेका दिला असता तर मंडळाला आर्थिक फायदा झाला असता. सदर ठेका हा केवळा रु.1505000/- ला दिल्याने मंडळाचे नुकसान झाले आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना दर्गा हजरत सय्यदशहा तुराबुल हक्क रहे. परभणी येथील परिसरात हॉटेल, टिन शेड, पान शॉप , दुकाने, गुळ फुटाणे, शेरणी दुकाने चालविण्याचा ठेका देणेबाबत निवीदा मागविण्यात आल्या. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | इसारा रक्कम | रु.300000 |
| 2 | अंदाजीत रक्कम | रु.2000000 |

| | | |
|---|---|---|
| 3 | को-या निवीदांची किंमत | रु.2000 |
| 4 | कालावधी | दि.20/07/2017 ते 19/07/2018 |
| 5 | जाहीर प्रसिध्दी | दैनिक दिव्य मराठी, दैनिक औरंगाबाद टाईम्स दि.08/07/2017 |
| 6 | करारनामा | रु.100 चे मुद्रांकावर केलेला आहे. |
| 7 | निवीदा भरणा कालावधी / निवीदेचा प्रकार | दि.07/07/2017 ते 14/074/2017<br>ई-निवीदा 2017 _ MDD _ 231085 _1 |
| 8 | निवीदा उघडणे | दि.15/07/2017 दुपारी 03-00 वाजता |
| 9 | प्राप्त निवीदा | 1) बाबा कॅन्टीन, अब्दुल नदीम अब्दुल गणी - रु.1321000/-<br>2) रचना इलेक्ट्रीकल्स, अय्युब अ.गणी - रु.986000<br>3) जावेद मिठाई भांडार, जावेद खान रु. -1407000/- (अंतीम वाटाघाटी अंती रु.1505000) |
| 10 | निवीदा मंजुरी | जावेद मिठाई भांडार, जावेद खान रु. -1407000/- (अंतीम वाटाघाटी अंती रु.1505000) |
| 11 | पुरवठा आदेश | कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/क्र.मरावमं/ एसएनटी/टेंडर/1845/2017 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.25/07/2017 |
| 12 | गुत्तेदाराने रक्कम भरणा केल्याचा तपशिल | 1) पावती क्र.1110 दि. 26/07/2017 रु.600000<br>एकूण रक्कम = रु.600000 |

वरील प्रमाणे उरुसात हॉटेल, टिन शेड, खुली जागा व शेरणी दुकाने चालविण्याचा ठेका लिलावासाठी एकुण 03 निवीदा प्राप्त झाल्या असुन सर्वात कमी दराची निवीदा जावेद मिठाई भांडार, जावेद खान रु.1407000/- (अंतीम वाटाघाटी अंती रु.1505000/- असल्याने संबंधीतास पुरवठा आदेश देण्यात आला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) जावेद मिठाई भांडार, जावेद खान यांना कामाचे आदेश कामाचे आदेश जा.क्र.एसएनटी/टेंडर/क्र.मरावमं/ एसएनटी/टेंडर/1845/2017 महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद दि.25/07/2017 अन्वये देण्यात आले असून सदरील निवीदेची एकूण रक्कम खालीलप्रमाणे तीन हप्त्यात मंडळाकडे भरणा करावी.

1) रुपये 752500/- - करारनामा करुन देतेवेळेस (03 दिवसाच्या आंत)

2) रुपये 376250/- - 31 ऑक्टोंबर 2017 पर्यंत

3) रुपये 376250/- - 31 जानेवारी 2018 पर्यंत

पुरवठा आदेशाप्रमाणे तसेच निवीदेतील अट क्रमांक 13 अन्वये मंजुर निवीदा रकमेच्या 50 टक्के रक्कम निवीदा मंजुर करण्याच्या दिनांकापासून 03 दिवसाच्या आत मंडळाकडे भरली नाही. तर निवीदा रदद करण्यात येईल व गुत्तेदाराने भरलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल असे असताना सदर पुरवठादाराने रु.600000/- भरल्याबाबत पावती क्र.1110 दि. 26/07/2017 रु.600000 या पावतीवरुन दिसून येते. उर्वरीत रक्कम रु.905000/- भरल्याबाबत पावत्या दिसून आल्या नाहीत. तेव्हा मंडळाने सदर जावेद मिठाई भांडार, जावेद खान यांना देण्यात आलेला ठेका रदद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे मंडळाचे रक्कम रु.905000/- इतक्या रकमेचे नुकसान झाल्याने सदर रक्कम

संबंधीत गुत्तेदाराकडून वित्तीय वर्षाअखेरपर्यंत उर्वरीत रक्कम भरणा करण्यात आल्याचे अभिलेखे न आढळून आल्याने दंडासह रक्कम वसुल करून, रक्कम मंडळास भरल्याबाबत पावतीसह अनुपालन सादर करावे.

2) कंत्राटदाराने इसारा रक्कम रुपये 300000/- भरलेली असून त्याप्रमाणे निविदेतील अट क्रमांक 11 नुसार ठेकेदारास निविदा मंजूर झाल्यानंतर इसारा रक्कमेच्या 3 टक्के रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक असतांना रुपये 100 रुपायाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याचे लेखापरीक्षण पथकास आढळून आले आहे. तरी इसारा रक्कम रुपये 300000 X 3 % = 9000 वजा 100 एकूण रुपये 8900/- ठेकेदाराकडून वसूल करुन अनुपालन सादर करावे.

3) कंत्राट संपल्यानंतर दि.19/07/2018 रोजी दर्गा परिसर रिकामा केल्यानंतर तेथे सर्व साफसफाई केलेबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र दिसून आले नाही.

4) सदर निवीदेची किंमत अंदाजे 20 लक्ष ठरविण्यात आली होती, मंडळाचे हित पाहता बोलीची रक्कम 20 लाखापर्यंत बोलून संबंधीताशी वाटाघाटी करुन किंवा फेरनिवीदा बोलवून 20 लाखापर्यंत ठेका दिला असता तर मंडळाला आर्थिक फायदा झाला असता. सदर ठेका हा केवळा रु.1505000/- ला दिल्याने मंडळाचे नुकसान झाले आहे. उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 2 | 10/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचा संकेतांक | DATZCSM6701 |

| | |
|---|---|
| 5 | बँक ताळमेळाबाबत. |
| योजना संकेतांक | योजनेचे नाव |
| 0 | लेखा शाखा, वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर. |

| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 2 | 9अ | 1 | 0 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

---

वक्फ बोर्ड सन 2017-2018 या वर्षाचे लेखापरीक्षणात खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील सामान्य रोखवही व बँकेतील दिनांक 31/03/2018 अखेर शिल्लक रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| निधीचे नाव | खाते क्रमांक | दिनांक 31/03/2018 अखेर सामान्य रोखवहीतील शिल्लक रक्कम | दिनांक 31/03/2018 अखेर बँकेतील शिल्लक रक्कम | तफावत |
|---|---|---|---|---|
| वक्फ फंड | 52071931474 | 12681664 | 13126245 | 444581 |
| इन्सिटटयुशन फंड | 52071931463 | 38039103 | 304704.28 | 37734398.72 |
| | | | एकूण | 38178979.72 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंडळाने सामान्य रोखवहीतील शिल्लक रकमेशी बँकेतील शिल्लक रकमेचा दिनांक 31/03/2018 अखेर ताळमेळ घेतलेला नाही. त्यामुळे सदर ताळमेळ घेवून तफावतीची एकूण रक्कम रुपये 38178979.72 ची तफावत दूर करुन अनुपालन सादर करावे.

उपरोक्त बाबीची पुर्तता करुण अनुपालन सादर करावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATSSPM8801 |

| 6 | वसुलीच्या रकमा विलंबाने बँकेत भरणा करणे बाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | | |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 |

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता वक्फ मंडळाच्या मालमत्तेचे भाडे, विविध शुल्कांच्या वसुल केलेल्या रोख रकमा वसुली लिपीकांनी विलंबाने बँकेत भरणा केल्याचे दिसून येते.

याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

जिल्हा कार्यालय छत्रपती संभाजीनगर :-

| अ. क्र. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम | बँकेत भरणा दिनांक | विलंब (दिवसांत) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 98739 ते 98763 | 27/03/2017 | 324785 | 05/04/2017 | 10 |
| 2 | 99008 ते 99062 | 03/04/2017 | 30480 | 11/04/2017 | 09 |
| 3 | 99102 ते 99120 | 06/04/2017 | 16895 | 15/04/2017 | 10 |
| 4 | 99121 ते 99140 | 07/04/2017 | 113030 | 15/04/2017 | 09 |
| 5 | 99188 ते 99217 | 12/04/2017 | 18122 | 20/04/2017 | 09 |
| 6 | 99272,99274, 99277,99285, 99287,99300 | 18/04/2017 | 3805 | 25/04/2017 | 08 |
| 7 | 99507 ते 99514 | 11/05/2017 | 3617 | 29/05/2017 | 18 |
| 8 | 99516 ते 99527 | 12/05/2017 | 4170 | 29/05/2017 | 17 |
| 9 | 99530 ते 99550 | 15/05/2017 | 21706 | 29/05/2017 | 14 |
| 10 | 99552 ते 99554 | 17/05/2017 | 750 | 29/05/2017 | 12 |
| 11 | 99555 ते 99571 | 19/07/2017 | 6260 | 29/05/2017 | 10 |
| 12 | 99515 | 11/04/2017 | 6270 | 29/05/2017 | 18 |
| 13 | 99528 | 12/05/2017 | 2000 | 29/05/2017 | 17 |
| 14 | 99551 | 16/05/2017 | 14745 | 29/05/2017 | 13 |
| 15 | 99572 | 20/05/2017 | 40090 | 29/05/2017 | 09 |
| 16 | 99574 ते 99588 | 22/05/2017 | 3040 | 06/06/2017 | 15 |
| 17 | 99589 ते 99600 | 23/05/2017 | 7207 | 06/06/2017 | 16 |
| 18 | 504 ते 514 | 23/05/2017 | 6370 | 06/06/2017 | 16 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19 | 522 ते 530 | 24/05/2017 | 5230 | 06/06/2017 | 15 |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1) वरीलप्रमाणे वेगवेगळया प्रकारे वसुल करण्यात आलेल्या रकमा वसुल झाल्यानंतर 03 दिवसाच्या आत बँकेत भरणा करणे आवश्यक असताना सदर रक्कम बँकेत उशीरा भरण्यात आलेली आहे. याबाबत खुलासा सादर करावा.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATSSPM8801 |

| 7 | प्रवासभत्ता अग्रिम समायोजनांबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | लेखा शाखा, वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | 2 | 9अ | 1 | 15000 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 15000 | 0 | 0 | 0 |

---

वक्फ बोर्ड सन 2017-2018 या वर्षाचे लेखापरीक्षणात खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कर्मचा-यांना वक्फ मंडळाच्या कामांसाठी वेळोवेळी प्रवासभत्ता अग्रिम मंजूर करण्यात येतो. सदरील मंजूर करण्यात आलेला अग्रिम खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक/दिनांक | कर्मचा-यांचे नांव | अग्रिम रक्कम | समायोजन झालेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 604/ 24/10/2017 | 1) श्री. मोहम्मद लतीफोददीन रुपये 5000<br>2) श्री. मोहम्मद सोहेल रुपये 5000<br>3) श्री. मुजम्मील खान रुपये 5000<br>एकूण रुपये 15000 | 15000 | समायोजन झालेले नाही. |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणकान्वये विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे 03 कर्मचा-यांना वक्फ मंडळाच्या कामांसाठी प्रवास भत्ता अग्रिम रुपये 15000/- मंजूर करण्यांत आलेला आहे. लेखापरीक्षण वर्षात संबंधीतांनी प्रवास केल्याचे प्रवास भत्ता देयक, मंजूर दैनंदिनी कार्यालयास सादर केल्याचे लेखापरीक्षणास अभिलेखे आढळून आलेले नसल्याने सदरील रक्कम समायोजीत झाली किंवा नाही याची खात्री पटत नाही. तरी सदरील अनुपालन अहवाल सादर करुन पुर्तता दर्शवावी.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATSSPM8801 |
|---|---|

| 8 | अग्रिम समायोजनांबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | लेखा शाखा, वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर. | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | 2 | 9अ | 1 | 15000 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 15000 | 0 | 0 | 0 |

---

वक्फ बोर्ड सन 2017-2018 या वर्षाचे लेखापरीक्षणात खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कर्मचा-यांना अग्रिम मंजूर करण्यात आलेला आहे.. सदरील मंजूर करण्यात आलेला अग्रिम तपशीलासह खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्र.क्र./दिनांक | कर्मचा-यांचे नांव/पदनाम | अग्रिम रक्कम | अग्रिमाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | 607/ 26/10/2017 | श्री.शेख हारुन (वाहन चालक) | 25000 | प्लॉट खरेदी |
| 2 | 622/ 27/10/2017 | श्री मिर्झा नकवी (लिपीक) | 25000 | शौचालय भिंत दुरुस्ती |
| 3 | 474/ 26/04/2017 | श्री. मोहम्मद एजाज (लिपीक) | 25000 | वैयक्तीक कर्ज |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणकान्वये विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे 03 कर्मचा-यांना वरील कारणांसाठी अग्रिम रुपये प्रत्येकी 25000/- प्रमाणे एकूण अग्रिम रुपये 75000/- मंजूर करण्यांत आलेला आहे. लेखापरीक्षण वर्षात संबंधीतांनी परंतु सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करत असतांना सदर कालावधीमध्ये संबंधीतांच्या वेतन देयकांमध्ये रुपये 1250/- प्रमाणे मासीक हप्ता वसूली दिसून आलेली असून किती हप्ते वसूल झाले व किती बाकी याची खात्री पटत नसून व्याजाची रक्कम 8.5 टक्के दराने वसूल झाल्याचे वेतन देयकांमध्ये दिसून आले नाही. तसेच सदरील रक्कमेंबाबत उपयोगीता प्रमाणपत्र सादर केल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही. तरी नियमांप्रमाणे व्याजाची रक्कम वसूल करुन मंडळास जमा केल्याचे दर्शवून अनुपालन अहवाल सादर करुन पुर्तता दर्शवावी.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 03/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATSSPM8801 |
|---|---|

| 9 | विमान प्रवासावर नोंदविलेल्या खर्चाबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9अ | 05 | 69783 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 69783 | | 0 | 0 |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 03 मार्च 2010 मधील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (अ) नुसार सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही तसेच परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने / मार्गाने (पत्र मिळाल्यानंतर) वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येईल, मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणा-या विमान कंपन्यांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही, असे असतानासुध्दा नियमबाहयरीत्या परतीचा विमान प्रवास केला आहे. सदर प्रवास करणेबाबत तात्काळ जाणे असलेबाबत देयकासोबत न्यायालयाचे पत्र दिसून आले नाही. सदर प्रवासाबाबत कोणतीही पूर्वपरवानगी घेतल्याचे देयकासोबत दिसून आले नाही. तसेच कार्योत्तर मंजुरीही देयकासोबत दिसून आली नाही. अर्धसमास पत्र क्रमांक 04 दिनांक 15/07/2024 अन्वये अर्धसमास पत्र देऊन खुलासा विचारला असता विभागाने याबाबत कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना विमान प्रवासावर खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे खर्च नोंदविल्याचे दिसून येते.

| अ. क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल | विमान प्रवास |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 558 | 08/2017 | 7870 | श्री.एस.सी.तडवी | औरंगाबाद ते मुंबई |
| 2 | 565 | 30/08/2017 | 11472 | श्री.एस.सी.तडवी | औरंगाबाद ते मुंबई |
| 3 | 634 | 26/11/2017 | 42423 | 1)श्री. हुसेन दलवाई रु.4303 मुंबई, रु.7836 औरंगाबाद<br>2) श्री. हबीब फकीह रु.4303 मुंबई, रु.7836 औरंगाबाद | औरंगाबाद ते मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 3) श्री.आसिफ कुरेशी रु.4303 मुंबई<br>4) श्री.खालेद बाबू कुरेशी रु.4303 मुंबई, रु.5236 औरंगाबाद<br>5)श्री.इम्तीयाज काजी सहॉब रु.4303 मुंबई | |
| 4 | 644 | 22/11/2017 | 8018 | श्रीएस.सी.तडवी, रु. 4008 मुंबई, रु.4010 औरंगाबाद | औरंगाबाद ते मुंबई |
| | | एकूण | 69783 | ----- | ---- |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

1) वरीलप्रमाणे कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी न्यायालयीन तसेच कार्यालयीन कामासाठी औरंगाबाद ते दिल्ली व औरंगाबाद ते मुंबई असा विमान प्रवास केला असून त्यापोटी वरील प्रमाणकांन्वये संबंधीतास रक्कम अदा करण्यात आली आहे.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च 2010 मधील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (अ) नुसार सचिवापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने/मार्गाने (पत्र मिळाल्यानंतर) वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधीत प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमान प्रवास करता येईल, मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणा-या विमान कंपन्यांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे अशी तरतुद असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

3) उपरोक्त नमुद शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 4.1 मधील (क) नुसार परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही, असे असतानासुध्दा नियमबाहयरीत्या परतीचा विमान प्रवास केला आहे.

4) सदर प्रवास करणेबाबत तात्काळ जाणे असलेबाबत देयकासोबत न्यायालयाचे पत्र दिसून आले नाही.

5) सदर प्रवासाबाबत कोणतीही पूर्वपरवानगी घेतल्याचे देयकासोबत दिसून आले नाही. तसेच कार्योत्तर मंजुरीही देयकासोबत दिसून आली नाही. तेव्हा मंजुरीविना केलेला प्रवास तसेच मंजुरीविना पारीत केलेले देयक लेखामान्य करता येत नाही.

वरीलप्रमाणे अर्धसमास पत्र क्रमांक 04 दिनांक 15/07/2024 अन्वये अर्धसमास पत्र देऊन खुलासा विचारला असता विभागाने याबाबत कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे केलेला विमान प्रवास अनुज्ञेय ठरत नाही. सदर खर्च रक्कम अमान्य करण्यात येत आहे.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 04 | 15/07/2024 | 2017-2018 | 2017-2018 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATJFPM7101 |

| 10 | जमा रक्कमा लेख्याबाहेर ठेवून केलेल्या अपहाराबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9 क | | 343486 |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | 343486 | 0 | 0 |

---

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे पुणे कार्यालयाचे बुक क्रमांक 04 च्या वसूलीच्या रक्कमा लेख्याबाहेर ठेवल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आलेले आहे. (बँक खाते क्रमांक स्टेट बँक ऑफ इंडिया खाते क्रमांक 62053179358)

| अ.क्र. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम | |
|---|---|---|---|---|
| 1 | 301 | नमुद नाही | 20207 | |
| 2 | 304 | 05/06/2017 | 9350 | |
| 3 | 305 | नमुद नाही | 5131 | |
| 4 | 306 | नमुद नाही | 1000 | |
| 5 | 307 | नमुद नाही | 820 | |
| 6 | 308 | नमुद नाही | 820 | |
| 7 | 309 | नमुद नाही | 820 | |
| 8 | 310 | नमुद नाही | 820 | |
| 9 | 311 | नमुद नाही | 820 | |
| 10 | 312 | नमुद नाही | 3165 | |
| 11 | 313 | नमुद नाही | 9000 | |
| 12 | 314 | नमुद नाही | 2210 | |
| 13 | 315 | नमुद नाही | 3066 | |
| 14 | 317 | नमुद नाही | 1052 | |
| 15 | 318 | नमुद नाही | 3120 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 16 | 319 | नमुद नाही | 3000 | | |
| 17 | 320 | नमुद नाही | 24314 | | |
| 18 | 321 | नमुद नाही | 17670 | | |
| 19 | 322 | नमुद नाही | 25336 | | |
| 20 | 323 | नमुद नाही | 13843 | | |
| 21 | 324 | नमुद नाही | 950 | | |
| 22 | 325 | नमुद नाही | 950 | | |
| 23 | 326 | नमुद नाही | 450 | | |
| 24 | 327 | नमुद नाही | 6900 | | |
| 25 | 329 | नमुद नाही | 10150 | | |
| 26 | 330 | नमुद नाही | 12573 | | |
| 27 | 332 | नमुद नाही | 5530 | | |
| 28 | 333 | नमुद नाही | 7156 | | |
| 29 | 334 | नमुद नाही | 820 | | |
| 30 | 335 | नमुद नाही | 620 | | |
| 31 | 336 | नमुद नाही | 620 | | |
| 32 | 337 | नमुद नाही | 620 | | |
| 33 | 338 | नमुद नाही | 19383 | | |
| 34 | 339 | नमुद नाही | 4090 | | |
| 35 | 343 | नमुद नाही | 30 | | |
| 36 | 347 | नमुद नाही | 8700 | | |
| 37 | 348 | नमुद नाही | 830 | | |
| 38 | 349 | नमुद नाही | 14000 | | |
| 39 | 351 | नमुद नाही | 10000 | | |
| 40 | 352 | नमुद नाही | 8135 | | |
| 41 | 353 | नमुद नाही | 18505 | | |
| 42 | 354 | नमुद नाही | 620 | | |
| 43 | 355 | नमुद नाही | 840 | | |
| 44 | 356 | नमुद नाही | 840 | | |
| 45 | 357 | नमुद नाही | 840 | | |
| 46 | 358 | नमुद नाही | 2145 | | |
| 47 | 359 | नमुद नाही | 1480 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 48 | 360 | नमुद नाही | 13798 | |
| 49 | 361 | नमुद नाही | 12585 | |
| 50 | 362 | नमुद नाही | 820 | |
| 51 | 363 | नमुद नाही | 820 | |
| 52 | 364 | नमुद नाही | 1000 | |
| 53 | 365 | नमुद नाही | 1000 | |
| 54 | 366 | नमुद नाही | 3142 | |
| 55 | 367 | नमुद नाही | 2080 | |
| 56 | 368 | नमुद नाही | 620 | |
| 57 | 369 | नमुद नाही | 620 | |
| 58 | 370 | नमुद नाही | 620 | |
| 59 | 372 | नमुद नाही | 620 | |
| 60 | 373 | नमुद नाही | 620 | |
| 61 | 374 | नमुद नाही | 350 | |
| 62 | 375 | नमुद नाही | 21450 | |
| | | एकूण | 343486 | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 33 | 08/03/2021 | 2011-2012 | 2011-2012 | 0 |

| | |
|---|---|
| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATJFPM7101 |

| 11 | रदद केलेल्या पावत्यांबाबत. | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | | | | |
| 0 | 0 | | | | |
| शाखा संकेतांक | लेखा शिर्ष | निधीचा स्त्रोत | कलम | अनियमिततांची संख्या | गुंतलेली रक्कम |
| 0 | 0 | वक्फ फंड | 9 क | | |

| आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम |
|---|---|---|---|
| 0 | | 0 | 0 |

---

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन 2017-2018 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना खालील तपशिलात दर्शविलेप्रमाणे पुणे कार्यालयाचे बुक क्रमांक 04 च्या वसूलीच्या पावत्या लिहलेल्या आहेत परंतु त्या रदद करुन जशाच्या तशा पुस्तकात आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक | दिनांक | रक्कम | |
|---|---|---|---|---|
| 1 | 302 | नमुद नाही | 17460 | |
| 2 | 340 | नमूद नाही | 92693 | |
| | | एकूण | 110153 | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत -

| अर्ध समास ज्ञापन क्र | दिनांक (dd/mm/yyyy) | लेप .वर्ष पासून )yyyy-yyyy+1( | लेप .वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|---|
| 33 | | | | 0 |

| लेखापरीक्षकाचासंकेतांक | DATJFPM7101 |
|---|---|

## वक्फ बोर्ड,औरंगाबाद सन 2017-18

**किरकोळ परिच्छेद :-**

लेखापरीक्षण कालावधीत किरकोळ स्वरूपाच्या आक्षेपांची पूर्तता केल्यामुळे किरकोळ स्वरूपाचे आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आले नाही.

**उत्तरे:**

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम-1930 चे कलम 10 (1) मधील तरतुदीनुसार लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचे दिनांकापासून चार महिन्याचे आत लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन अहवाल वक्फ बोर्डाच्या ठरावाच्या प्रतीसह मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,छत्रपती संभाजीनगर यांचे स्वाक्षरीने सहायक संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात पाठवावा.

**पोच:** सदरील लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याबाबतची दिनांकित पोच या कार्यालयास देण्यात यावी.

सहायक संचालक,<br>
स्थानिक निधी लेखापरीक्षा,<br>
छत्रपती संभाजीनगर.

जा.क्र.स्था.18/ब/लेपअ/वक्फ बोर्ड./2017-18/793 दिनांक 11./04/2025

१.मा.प्रधान सचिव,अल्पसंख्याक विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र शासन,मुंबई<br>
२.मा.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,नागपूर-2<br>
३.मा.प्रधान सचिव,(वित्तीय सुधारणा) वित्त विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र शासन,मुंबई<br>
४.मा,विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग,छत्रपती संभाजीनगर.<br>
५.मा.संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा,संचालनालय,महाराष्ट्र राज्य,रायगडभवन, नवी मुंबई.<br>
६.मा.सहसंचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा, छत्रपती संभाजीनगर विभाग,छत्रपती संभाजीनगर.<br>
७.मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड, छत्रपती संभाजीनगर जिल्हा :- छत्रपती संभाजीनगर.<br>
८.पुनर्विलोकन शाखा,मुंबई कार्यालय,मुंबई.<br>
९.पुनर्विलोकन शाखा, छत्रपती संभाजीनगर कार्यालय,छत्रपती संभाजीनगर.<br>
१०.पुनर्विलोकन शाखा,प्रस्तुत कार्यालय,<br>
११.डी.संचिका<br>
१२.जादा प्रत

सहायक संचालक,<br>
स्थानिक निधी लेखापरीक्षा,<br>
छत्रपती संभाजीनगर.